पाटबंधारे प्रकल्पांतर्गतची बांधकामे
दगडी बांधकामा ऐवजी संधानकात
(कॉंक्रीट मध्ये) करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
परिपत्रक क्रमांक संकीर्ण /१०१/२००१/(५७१/२००१)/मीप्र-२
दि. ९/७/२००२

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्र.एमआयएस १०९३/(३६५/९३)/मीप्र (प्र), दि.४ ऑक्टोबर १९९३.
२) शासन पत्र क्र.संकीर्ण १०९३/(३६५/९३)/मीप्र (प्र), दि.२.१.९५

प्रास्तविक -

दगडी बांधकामाची गुणवत्ता योग्य प्रतीची राखली जात नसल्याचे शासनाच्या वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे, तसेच आणलेही गेलेले आहे, या दृष्टीकोनातून चांगल्या गुणवत्तेची बांधकामे होण्यासाठी योग्य त्या उपाययोजनांचा अवलंब देखील वेळोवेळी करण्यात आलेला आहे. या संदर्भात वरील परिपत्रकांव्दारे कालव्यावरील बांधकामातील प्रस्तंभ व अंत्यस्तंभ संधानकात करण्या संदर्भातील आदेश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. आता पाटबंधारे प्रकल्पांतर्गत दगडी बांधकामाऐवजी संधानकात बांधकामे करणे अनिवार्य करण्याचा प्रश्न काही काळ शासनाचे विचाराधीन होता. या विषयानुषंगाने धुळे येथे झालेल्या मुख्य अभियंता परिषदेत चर्चा झालेली आहे व सर्वच मुख्य अभियंता यांनी यापुढे दगडी बांधकामाऐवजी संधानकाचा वापर करण्याबद्दल आग्रहाने मते मांडली व तशी शिफारस केली याला अनुसरुन खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश :-

१.० पाटबंधारे प्रकल्पांतर्गत येथून पुढील कालावधीत कालव्यावरील सर्व बांधकामे संधानकात करणे अनिवार्य करणेत येत आहे. त्याचवेळी बांधकामे खर्चिक होणार नाहीत यासाठी बांधकामाच्या गरजेनुसार योग्य त्या प्रतीचे (grade) संधानक वापरले जाईल हे पहाण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची राहील.

२.० शक्य असेल तेथे यांत्रिकी पध्दतीचा वापर करुन उत्तम संधानक तयार करणे व ते योग्य प्रकारे वापरणे याबाबत दक्षता घेऊन बांधकामाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक राहील. कोणतेही संधानकातील काम मिक्सर व व्हायब्रेटरच्या वापराशिवाय केले जाणार नाही याची काळजी घ्यावी. शटरींग व उत्तम फार्म वर्क ही संधानकाच्या कामाची आवश्यकता राहील. आर.सी.सी. कामात पुरेसे कव्हर दिले जात आहे याचीदेखील खातरजमा करावी. उत्तम संधानक निर्माण करण्याची व त्याच्या प्लेसमेंटची चांगली व्यवस्था या बाबी पण आवश्यक राहतील.

[कृ.मा.प.-

दगडी धरणाच्या बाबतीत मात्र जेथे कमी अंतरावर उत्तम गुणवत्तेची नैसर्गिक वाळू उपलब्ध आहे, बांधकामाचे परिमाण कमी आहे व इतर बाबी पूरक आहेत, तेथे कोल ग्राऊट मेसनरीचा पर्याय खुला राहील. मात्र धरणाचे कोणतेही काम दगडी बांधकामात करु नये

३.० या आदेशानुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, ज्या निविदेअंतर्गतची कामे प्रगतीपथावर आहेत या निविदा मंजूर होऊन कार्यारंभ आदेश देणे अपेक्षित आहे अशा ठिकाणी मात्र बांधकाम प्रकारात कसलाही बदल करण्यात येऊ नये.

४.० या परिपत्रकातील सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी न चुकता नजरेस आणण्यात याव्यात.

५.० उपरोक्त सूचना पाटबंधारे विभागांतर्गत सर्व महामंडळांसाठी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि.मा. मोरे )
मुख्य अभियंता व सह सचिव

प्रत-

सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे
सर्व मुख्य अभियंता,
सर्व अधीक्षक अभियंता,
सर्व कार्यकारी अभियंता
सर्व तांत्रिक कार्यासने, पाटबंधारे विभाग, मंत्रालय
सर्व तांत्रिकी अधिकारी, पाटबंधारे विभाग, मंत्रालय

—x—x—x—

H-440-(1000-07-02)1a.